# आयुर्वेदाला संशोधनाची जोड मिळाल्यास त्यातही 'सुपरस्पेशालिटी' शक्य

## ● डॉ. अरुण जामकर यांचे मत
## ● 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' पुस्तकाच्या द्वितीय भागाचे प्रकाशन

**प्रतिनिधी, पुणे**

''**भारतीय परंपरेतील** आयुर्वेदामध्ये अनेक मोठ्या आजारांवर उपाचार करून ते बरे करण्याची क्षमता आहे. आयुर्वेदाला तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड मिळाल्यास त्यामध्येही 'सुपरस्पेशालिटी' येऊ शकेल,'' असे मत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे (एमयूएचएस) माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांनी व्यक्त केले.

'आरोग्यवर्धिनी चिकित्सालय' व 'बीव्हीजी इंडिया'तर्फे 'केशायुर्वेद' या संस्थेच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून- भाग २' या पुस्तकाचे बुधवारी प्रकाशन करण्यात आले. वैद्य हरीश पाटणकर यांच्या या पुस्तकातील लेख 'लोकसत्ता'च्या चतुरंग पुरवणीत २०१६ मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. 'केशायुर्वेद'च्या तीस उपकेंद्र प्रमुखांचा या प्रसंगी सत्कारही करण्यात आला. या वेळी डॉ. जामकर बोलत होते.

'बीव्हीजी' समूहाचे संचालक हणमंत गायकवाड, संचालिका वैशाली गायकवाड, स्वप्नाली गायकवाड, 'एमयूएचएस'च्या आयुर्वेद व युनानी शाखेचे अधिष्ठाता डॉ. सतीश डुंबरे, राज्याच्या 'आयुष' विभागाच्या सहायक संचालिका डॉ. सरिता गायकवाड, 'बुकगंगा'चे संस्थापक मंदार जोगळेकर या वेळी उपस्थित होते.




**वैद्य हरीश पाटणकर यांनी लिहिलेल्या आणि 'लोकसत्ता'मध्ये यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'आयुर्वेदाच्या स्मृतीतून' या लेखमालिकेच्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे बुधवारी प्रकाशन करण्यात आले. या वेळी (डावीकडून) डॉ. सतीश डुंबरे, डॉ. अरुण जामकर, वैद्य पाटणकर, मंदार जोगळेकर, डॉ. सरिता गायकवाड उपस्थित होते.**

''आयुर्वेदिक उपचार पद्धतींचा अभ्यास करून 'सुपरस्पेशालिटी' मिळविण्याकडे सध्या कल वाढत आहे. परंतु आयुर्वेदात मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. आयुर्वेदाची सेवा करणाऱ्यांनी आपण करत असलेल्या संशोधनाचे दस्तऐवज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन करायला हवेत,'' असे डॉ. जामकर यांनी सांगितले.

डॉ. गायकवाड म्हणाल्या, ''आयुर्वेदात क्षमता असूनही वारंवार आयुर्वेद हे शास्त्र आहे, हे सिद्ध करावे लागते. आयुर्वेदात शरीररचना, राहणीमान या सगळ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. आयुर्वेदाच्या क्षमता समजून घ्यायला हव्यात.''

''केसांवर आयुर्वेदातून उपचार हा नवीन विचार असून अशा प्रकारचा अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात 'फेलोशिप' अंतर्गत सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल,'' असे डॉ. डुंबरे यांनी सांगितले. या वेळी 'असोसिएशन ऑफ कॉस्मेटॉलॉजी, ट्रायकोलॉजी अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी'ची स्थापनाही करण्यात आली.


लोकसत्ता
Thu, 20 July 2017
epaper.loksatta.com//c/20691419